जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१४/०१/२०२५
## दि.१३/०१/२०२५ रोजी रात्री ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ०६/२०२५, भा.न्या.सं.कलम ३३१(४)३०५(अ) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २४ वर्षे रा.शिवाजीनगर पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि१३/०१/२०२५ रोजी पहाटे ०३/३० ते ०४/००.रमागणेश अपार्टमेंट फ्लॅट नं.१ पहिला मजला रेव्हेन्यु कॉलनी शिवाजीनगर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे घराचे सेफ्टी डोअरचे कुलुप व कोयंडा तोडुन तसेच लाकडी दाराचे कडी कोयंडा लॅच तोडुन आंत प्रवेश करून,बेडरूम मधील लाकडी कपाटातील २,५०,०००/-रु.किं.च्या सोन्याच्या बांगडया घरफोडी चोरी करून नेल्या. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अजीत बडे,मो.नं.८२७५४५२३८६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे २५/२०२५,भा.न्या.सं.कलम २८१,१०६(१),१२५(अ)(ब)मो.वा.का.क.१८४, ११९/१७७ |
| **फिर्यादी** | प्रशांत चाटे पोलीस अंमलदार सिंहगड रोड पोस्टे पुणे शहर |
| **आरोपीत** | एक ईकोकार चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०१/२०२५ रोजी रात्री ००/३० चे सुमा.साताराहुन मुंबईकडे जाणारे रोडवर स्वामी नारायण मंदिराचे समोर पुलाखाली |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ईकोकार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी असलेल्या खडकाला ईकोकार धडकावुन स्वतः जखमी होऊन कार मधील विजया बाजीराव पडवळ वय २९ वर्षे रा.शेळु आंबेठाण ता.खेड जि.पुणे यांचे मृत्युस कारणीभुत होवुन,गाडी मधील ७ जणांना किरकोळ जखमी करण्यास कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अक्षय पाटील मो.नं.९९२२२१०११० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे ०७/२०२५,भा.न्या.सं.कलम,३१९(२),३१८(४),३१६(५) आयटीॲक्ट६६(डी) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४२ वर्षे रा.नानापेठ,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०९/२०२४ रोजी ते दि.१९/१२/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नुमद मोबाईल धारक यांनी स्टॉक ट्रेडींग मध्ये दोनशे टक्के नफा मिळवता येवु शकतो असे अमिष दाखवुन ऑनलाईन एक लिंक पाठवुन त्याव्दारे बँकेच्या अकाऊन्टवर पैसे जमा करण्यास लावुन भरघोष नफा मिळत असल्याचे भासवुन कोणताही परतावा न देता फिर्यादीची ३२,८०,३२५/- रु.ची आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उमेश गिते मो.नं.९९२३१९३०८८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे २७/२०२५,भा.न्या.सं.कलम,३१८(४),३१९(२),२०४,६१(२)आयटीॲक्ट६६(सी)(डी) |
| **फिर्यादी** | एक महिला वय २८ वर्षे रा.नानापेठ,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०९/२०२४ रोजी ते दि.३०/०९/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नुमद मोबाईल धारक यांनी व्हिडिओ कॉल,स्काईप कॉलद्वारे ते टेलीकॉम ऑथरिटी ऑफ इंडिया मधुन असल्याचे सांगुन,आपल्या नावाने दिल्ली सायबर क्राईम येथे हयुमन ट्रॅफिकिंग,मनी लॉड्रिंगबाबत तक्रार केलेली असल्याचे सांगुन, फिर्यादीस बँक खाते व्हेरिफाय करणेकरिता बँक खात्यावर पैसे ट्रान्सफर करणेस सांगुन फिर्यादीची १३,१७,०००/- रू. ची ऑनलाईन आर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक(गुन्हे) खेडकर मो.नं.८८८८८०७६९९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३९/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०५,३३१(३) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४० वर्षे,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०१/२०२५ रोजी सायं.१८/०० ते १८/५०वा.चे दरम्यान इनामनगर,विजय सेल्स समोर, कोंढवा,पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नमुद ठिकाणाचे राहते घर कुलुप बंद असताना कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी सहाय्याने ते तोडुन आत प्रवेश करून घरातील बेडरूम मधील कपाटामध्ये ठेवलेले १,९३,५००/- रु.चे सोन्या-चांदीचे दागिणे चोरी करून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.रविंद्र गावडे मो.नं.९५९४९९३१९९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३७/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०९(५),३०९(६),३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३१ वर्षे रा.खडकवासला,पुणे |
| **आरोपीत** | तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०१/२०२५ रोजी १६/३० वा ते १७/०० वा चे दरम्यान जनता सहकारी बॅकेचे समोर, कात्रज-कोंढवा रोड,माऊलीनगर,कात्रज,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पेट्रोल पंपावर मॅनेजर म्हणुन काम करीत असुन ते पंपावरील जमा झालेली ३,४६,०००/- रु.रोख रक्कम भरणा करण्यासाठी बॅंकेत जात असताना नमुद ठिकाणी नमुद तीन अनोळखी इसमांनी त्यांचेवर पाळत ठेवुन त्यांना मारहाण करुन त्यांचेकडील असलेली रोख रक्कम हिसकावुन जबरदस्तीने चोरुन नेण्याचा प्रयत्न केला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शेंडे ०२०/२४३६५१०० |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे ०५/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०९(४),३(५) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ७० वर्षे रा.कोरेगाव पार्क पुणे |
| **आरोपीत** | दुचाकीवरील दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०१/२०२५ रोजी स.०९/३० चे सुमा.लेन नं.०७ कोरेगाव पार्क येथिल क्लोव्हर पार्क रॉयल सोसायटीचे समोरील मेन रस्त्यावर सार्व.ठिकाणी. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या नमुद ठिकाणाहुन घरी पायी जात असताना दुचाकी वरून आलेल्या नमुद दोन इसमांनी फिर्यादी यांचे गळयातील ३५,०००/-रू.कि.चे सोन्याचे मंगळसुत्र बळजबरीने हिसकावुन चोरून पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.दिपक जाधव मो.नं.८१०८९६६००९ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ११/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०९(४),३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४८ वर्षे रा.मार्केट यार्ड, पुणे |
| **आरोपीत** | दुचाकीवरील दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०१/२०२५ रोजी रात्री २३/०० वा.चे सुमा.देहाती चौक,प्रभात रोड,पुणे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी थांबुन ओला कॅब बुक करत असताना नमुद दुचाकीवरील इसम हे फिर्यादी यांचेजवळ येवुन फिर्यादी यांचे हातातील ८०,०००/-रू.कि.चा मोबाईल फोन जबरदस्तीने नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेश भोसले मो.नं.९८५०१५११०० |

**९**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बाणेर पो स्टे २६/२०२५,भा.न्या.सं.कलम १०९ महा.पो.अधि.कलम ३७(१)३ सह १३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३६ वर्ष रा.ज्युपिटर हॉस्पीटल,शेजारी पुणे मुळ पत्ता डोंगरमळा वडनेर रोड निघोज, ता.पारनेर जि.अहमदनगर |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०१/२०२५ रोजी स.०८/३० वा.चे सुमा.हॉटेल ग्रॅव्हीटीइन,ज्युपिटर हॉस्पीटल,शेजारी पुणे येथिल रूम नं.१०७ |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद हॉटेलमध्ये रिसपनिस्ट म्हणुन कामास असुन नमुद ठिकाणी नमुद इसमाने कोणत्या तरी कारणावरून त्याची पत्नी हिचे दंडावर व छातीवर जिवे ठार मारण्याचे इरादयाने चाकुने वार करून गंभीर जखमी करून स्वतःचे गळयावर व पोटामध्ये चाकु खुपसुन स्वतः गंभीर जखमी झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.अनिल केकान मो.नं.९९२२९३७८५७ |

**१०**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १२/२०२५,भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४),३०५ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४६ वर्षे रा.पाषाण,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०१/२०२५/रोजी दु.१६/४० ते दि.१३/०१/२०२५ रोजी स. ०७/०० वा.चे दरम्यान पंडित राव आगाशे इंग्लीश मिडीअम स्कुल मेन ऑफिस मध्ये लॉ कॉलेज रोड डेक्कन पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नमुद ठिकाणाचे शाळेमधील ऑफिसचे मेनगेटचे व ऑफिसचे कूलुप कोणीतरी अज्ञात इसमाने कशाच्या तरी सहाय्याने तोडून आत प्रवेश करून ऑफिसमधील कपाटातील रोख ३,१७,६७८/- रु.चोरुन नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.महेश भोसले मो नं ९८५०१५११०० |

**११**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३२/२०२५,भा.न्या.सं.कलम ३०३(२)एअर क्राफ्ट रुल १९३७ चे कलम २५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४२ वर्षे रा.यमुना नगर,निगडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम(अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०१/२०२५ रोजी १७/५८ वा. ते दि.१३/०१/२०२५ रोजीचे ००/०५ वा. या कालावधीत दिल्ली ते पुणे विमानाने प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे दिल्ली ते पुणे विमानाने प्रवास करीत असताना, न्यु दिल्ली मेट्रो स्टेशन येथे एअर इंडिया कंपनीचे काउंटर येथे बॅग चेक इन केल्यानंतर पुणे एअरपोर्ट येथे लगेज बॅग कलेक्ट करुन बॅगमध्ये असलेली १,८०,४५०/-रु रोख रक्कम प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने बॅगेतुन चोरी करून नेली. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार एस.एल.जामदार मो.नं.८५५४९८०७९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**